


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक २०६, शनिवार २७ एप्रिल २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# विखे घाबरले ! डमी उमेदवार देऊन खेळला रडीचा डाव!

## ■ महाविकास आघाडीचा आरोप ■ नीलेश साहेबराव लंके यांचा डमी अर्ज दाखल

नगर : प्रतिनिधी

**विखे घराण्याच्या ५० वर्षाच्या राजकारणाच्या परंपरेप्रमाणे यंदाच्या लोकसभा निवडणूकीतही त्यांनी नीलेश साहेबराव लंके या डमी उमेदवाराला निवडणूकीच्या रिंगणात उतरवून रडीचा डाव खेळल्याचा आरोप शुक्रवारी महाविकास आघाडीच्या वतीने पत्रकार परिषदेत करण्यात आला.**

राष्ट्रवादी भवन येथे पार पडलेल्या पत्रकार परिषदेस राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख प्रा. शशिकांत गाडे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष जयंत वाघ, काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष किरण काळे, काँग्रेसचे नगर तालुकाध्यक्ष संपतराव म्हस्के, आपचे संघटक सुभाष केकाण हे उपस्थित होते.



महाविकास आघाडीच्या वतीने बोलताना राजेंद्र फाळके यांनी सांगितले की, विखे हे डमीचा वापर अनेक ठिकाणी करतात. डॉ. सुजय विखे यांच्या डिग्रीबाबात त्यांच्या सख्ख्या चुलत्यानेच उल्लेख केला आहे. रक्ताच्या नात्यातील असल्याचे भासविण्यासाठी दुसरी व्यक्ती उभी करून संपत्तीची विल्हेवाट लावल्याचा आरोपही अशोक विखे यांनी केला असल्याचे फाळके यांनी सांगितले.

### तलाठी भरतीमध्येही डमी उमेदवार पास !

महसूल विभागाच्या तलाठी भरतीमध्येही अनेक डमी उमेदवार पास झाले. अशाच प्रकारे डमी उमेदवार उभा करून डॉ. सुजय विखे यांनी आपल्या कुटूंबाची परंपरा पुढे चालविली आहे. निवडणूक लढविण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे नावातील साधर्म्य पाहून दिशाभुल करण्यासाठी डमी अर्ज दाखल करण्यात आल्याचा आरोप फाळके यांनी केला.

### कोणती यंत्रणा पळाली ?

फाळके म्हणाले, निघोजच्या जानेवारी महिन्यात प्रसिध्द झालेल्या मतदार यादीत भाग क्र. ३११ मध्ये अनुक्रमांक १०३५ वर सतीश बळवंत लंके यांचे नाव आहे. त्यानंतर प्रसिध्द झालेल्या सुधारीत मतदार यादीत भाग क्र. ३११ मध्ये अनुक्रमांक १०३५ वर नीलेश साहेबराव लंके यांचे नाव आहे. नीलेश साहेबराव लंके यांचे नाव निघोजच्या मतदार यादीत टाकण्यासाठी अशी कोणतील शासकीय यंत्रणा पळाली असा सवाल फाळके यांनी केला.

### एकाच व्यक्तीने आणले दोघांचेही स्टॅम्प नोटरीचा वकीलही एकच

निवडणूक अर्जासोबत सादर करण्यात येणाऱ्या प्रतिज्ञापत्रासाठी डॉ. सुजय विखे यांच्यासाठी ज्या डी.पी. अकोलकर यांनी स्टॅम्प खरेदी केला, त्याच अकोलकर यांनी नीलेश साहेबराव लंके यांच्या प्रतिज्ञापत्रासाठी स्टॅम्प खरेदी केला आहे. तर एकाच वकीलाने दोघांचीही नोटरी केल्याचा दावाही फाळके यांनी कागदपत्रांसह केला.

### विखे कुटूंब घाबरले !

निवडणूक प्रक्रियेदरम्यान बातम्या चालवून संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न विखेंकडून होईल अशी शंका व्यक्त करतानाच गांधी मैदानावर झालेल्या सभेत शरद पवार यांनी नगरचा उमेदवार बदलण्यासाठी उद्योगपतीला पाठविल्या गंभीर आरोप केला होता. त्यामुळे विखे कुटूंब महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश ज्ञानदेव लंके यांच्या उमेदवारीला घाबलेले दिसते असे फाळके म्हणाले.

### डमी राजकारण जिल्हा खपवून घेणार नाही

लंके यांची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न होण्याची शक्यताही फाळके यांनी व्यक्त करतानाच ते नीलेश ज्ञानदेव लंके यांच्या उमेदवारीला घाबरले असतील तर त्यांनी त्यांच्या वरिष्ठांना, पक्षाला तसे कळवायला हवे होते. डमी राजकारण होणार असेल तर जिल्हा ते खपवून घेणार नाही असे फाळके म्हणाले.

### आमच्याकडेही दोन सुजय विखे आले होते

फाळके म्हणाले, आमच्याकडेही सुजय रमाकांत विखे व सुजय दिगंबर विखे हे दोन जण आले होते. आमचेही डमी अर्ज दाखल करा असे त्यांचे म्हणणे होते. मात्र आम्ही स्वारस्य नसल्याचे सांगत नकार दिला.

### भाजपाचे तालुकाध्यक्ष सुचक !

भारतीय जनता पार्टीचे तालुकाध्यक्ष राहुल प्रकाशराव शिंदे यांची नीलेश साहेबराव लंके यांच्या अर्जावर सुचक म्हणून स्वाक्षरी आहे. तर भाजपा कार्यकर्ते तथा सुप्याचे माजी उपसरपंच दत्तात्रय पवार, कडूसचे सरपंच मनोज मुंगसे, अस्लम इनामदार, आदीत्य ज्ञानेश्वर नरवडे, संतोष नामदेव वराळ, आकाश विजय वराळ, राहुल संजय पवार, ओंकार संतोष मावळे यांच्याही सुचक म्हणून स्वाक्षऱ्या आहेत.


### आम्हाला कोणतीही भिती नाही

आम्हाला कोणतीही भिती नाही. मात्र डमी नावाने गैरवापर नको म्हणून ही बाब आम्ही माध्यमांपुढे मांडली. निवडणूक निवडणूकीच्या पध्दतीने लढवून आचारसंहितेचे काटेकोर पालन महाविकास आघाडीकडून केले जाईल असेही फाळके यांनी स्पष्ट केले.

# गुजरातच्या २ हजार टन कांद्यासाठी निर्यात बंदी उठवली

## ■ अमोल कोल्हेंची सडकून टीका ■ मत मागायला तिकडेच जा, इकडं कशाला येता?

शिरूर: प्रतिनिधी



**महाराष्ट्रापेक्षा गुजरातमध्ये कांदा उत्पादक शेतकरी संख्येने कमी आहे. तरी केंद्र सरकारने गुजरातच्या २ हजार टन कांद्याची निर्यात बंदी उठवली. सरकारच्या याच निर्णयावर राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे नेते शिरूरचे खासदार अमोल कोल्हे यांनी जदार टीका केली आहे.**

मोदी सरकारला फक्त गुजरातच्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या हितसंबंधाची चिंता असल्याचे या निर्णयाने दाखवून दिले आहे. त्यामुळे मत मागायला गुजरातलाच जा, इकडे येऊच नका, अशा खणखणीत शब्दात खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी कांदा निर्यातीच्या धोरणावरून मोदी सरकारवर थेट हल्ला केला.

महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार खासदार डॉ. अमोल कोल्हे शिरुर तालुक्याच्या दौऱ्यावर आहेत. यावेळी त्यांच्यासोबत देवदत्त निकम, शेखर पाचुंदकर, स्वप्नील गायकवाड,दामु घोडे, शंकर जांभळकर आदी उपस्थित होते.

**मत मागायला तिकडेच जा, इकडे येऊच नका!**

डॉ. कोल्हे पुढे म्हणाले की, तुमच्या कांद्याची माती होती. तुमच्या ताटात माती कालवली जाती, याच्याशी मोदी सरकारला काही देणेघेणे नाही. हे आजच्या निर्णयावरून मोदी सरकारने दाखवून दिलं आहे.

जर मोदी सरकार फक्त गुजरातच्या कांदा उत्पादक शेतकऱ्यासाठी निर्णय घेत असेल तर आपण पण त्यांना सांगू शकतो मत मागायला तिकडेच जा. इकडे येऊच नका. असं सांगत भाजपच्या या निर्णयाला डॉ. कोल्हे यांनी कडाडून विरोध केला.

**आढळरावांची कोल्हेंवर टीका**

'निवडणूक जवळ आली म्हणून खासदार डॉ. अमोल कोल्हे यांना शेतीमालाला भाव मिळत नसल्याची आठवण झाली आहे. पाच वर्षे चित्रीकरणात व्यस्त असलेल्या कोल्हेंना निवडणुकीमुळे शेतकऱ्यांचा अचानक कळवळा आला आहे, अशी टीका करतानाच साडेचार वर्षे कांद्याला भाव होता का, शेतकरी सुखात होता,' असे वक्तव्य शिरूर मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी केले. साडेचार वर्षे कांद्याला भाव नव्हता, अशी कबुली आढळरावांनी दिल्याची चर्चा रंगली आहे. 'मी केलेल्या कामावर स्वत:च्या नावाचा उर्वरीत पान ३ वर

# आरक्षणाच्या विरोधकांना पूर्ण ताकदीने पाडा !

## ■ सर्वांनी आमचे वाटोळे केले, पण लोकशाहीचा हक्क बजावलाच पाहिजे ■ मनोज जरांगे पाटील यांचे आवाहन

जालना : प्रतिनिधी



**सर्वांनी आमचं वाटोळं केले पण लोकशाहीचा हक्क बजावला पाहिजे असे विधान करत मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी महाविकास आघाडीसह महायुतीवर टीकेची झोड उठवली आहे. या निवडणुकीत मराठा आरक्षणाला विरोध करणाऱ्यांना पाडा. निवडणुकीच्या रिंगणात आपले उमेदवार नसले तरी पाडण्यातही आपला विजय असेल, असे आवाहन त्यांनी मराठा समाज बांधवांना केले आहे. रुग्णवाहिकेतून जालन्यात पोहोचून केले मतदान.**

आज राज्यातील आठ जागांवर मतदान पार पडत आहे. मनोज जरांगे यांनीही आपला मतदानाचा हक्क बजावला. जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील कारखाना परिसरातील मतदान केंद्रावर त्यांनी मतदान केले. विशेष म्हणजे प्रकृती अस्वास्थामुळे जरांगेंवर छत्रपती संभाजीनगरमध्ये उपचार सुरू आहेत. उर्वरीत पान ३ वर

# माळशेज रेल्वे कृती समितीचा लंके यांना पाठींबा

## समितीच्या कार्यकारी मंडळाचे पाठींब्याचे पत्र

नगर : प्रतिनिधी

**नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश ज्ञानदेव लंके यांना माळशेज रेल्वे कृती समितीने पाठींबा जाहिर केला आहे. कृती समितीच्या कार्यकारी मंडळाने लंके यांच्या पाठींब्याचे पत्र प्रसिध्दीस दिले आहे.**



देशाची पश्चिम-पूर्व किनारपट्टी, मुंबई विशाखापट्टण यांना जोडणारा तसेच कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडयाला नजिकच्या मार्गाने मुंबईस जोडणारा अहमदनगर-कल्याण माळशेज रेल्वे मार्ग झाला पाहिजे या मागणीसाठी गेली तीस व माळशेज रेल्वे कृती समिती प्रयत्नशिल आहे. या मार्गासाठी निर्धार मेळावे, रेल्वे परिषदा, जनजागरण यात्रा, रेल्व रथयात्रा, ५ लाख लोकांची सहयांची मोहिम, दिल्ली यात्रा असे सोपस्कार या समितीने पार पाडले आहेत.

समितीच्या पाठपुराव्यामुळे सन २००६ साली या रेल्वेमार्गाचे सर्वेक्षण झाले. सन २०१९ पर्यंत मुरबाडपर्यंत पहिल्या टप्प्याच्या मंजुरीच्या केवळ घोषणा होत आहे. हा पहिला टप्पा जुन्नर-मढ पर्यंत होणे हे व्यवहारीकदृष्टया सोयीचे आहे. रेल्वे मंत्रालयाकडे थर्ड घाट रेल्वे प्रोजेक्ट म्हणून नोंद असलेला हा रेल्वेमार्ग झाला तर मराठवाडयासह नगर, जुन्नर, मुरबाडच्या शेतकऱ्याला उत्पन्नाचे जोडमार्ग प्राप्त होतील. या उर्वरीत पान ३ वर

### लंके यांची आत्मियता

या रेल्वेमार्गाच्या मंजुरीसाठी नीलेश लंके यांनी कायम आत्मियता दाखविली. वेळोवळी समितीला साथ दिली. त्यामुळे त्यांच्यासारखा धडाडीचा कार्यकर्ता खासदार म्हणून संसदेत जावा या भूमिकेतून आम्ही त्यांना पाठिंबा देत आहोत. नीलेश ज्ञानदेव लंके यांना प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# नीलेश लंके सकाळीच जॉगिंग ट्रॅकवर!

## विविध ठिकाणी नागरीकांच्या घेतल्या भेटी नागरीकांकडून लंके यांना प्रतिसाद

नगर : प्रतिनिधी

**लोकसभा निवडणूकीतील महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश ज्ञानदेव लंके यांनी शुक्रवारी शहरातील विविध जॉगिंग ट्रॅकला भेटी देत नागरीकांशी संवाद साधला. नागरीकांकडून त्यांचा मोठा प्रतिसाद लाभला.**



सकाळी सहा वाजता लंके यांचा दौरा सुरू झाल्यानंतर नागरीक त्यांच्याजवळ आपुलकीने जात होते. शुभेच्छा देत होते. होणारे खासदार साधे असल्याची प्रतिक्रीया एका महिलेने दिली. तर भल्या सकाळीच फिरण्यासाठी आलेल्या छोटया मुलाने नीलेश लंके आले, त्यांचे चिन्ह तुतारी वाजविणारा माणूस ही असल्याचे सांगितले. आम्हाला त्यांनी शिवपुत्र संभाजी हे नाटक दाखविल्याची आठवणही चिमुरडयाने करून दिली. लंके हे वाडीयापार्कवर पोहचले असता तिथे क्रिकेट खेळणाऱ्या तरूणांमध्ये ते सहजपणे मिसळले. हातात बॅट घेऊन क्रिकेट खेळण्याचा आनंदही त्यांनी लुटला.

पालघर येथे नोकरीनिमित्त असलेले दैठणे गुंजाळ येथील गृहस्थही सकाळी फिरण्यासाठी आले होते. माझ्याकडील नगर पासिंगची गाडी पाहिल्यानंतर ढवळपुरी येथील रहिवासी असलेल्या लंके यांच्या समर्थकाने माझी आस्थेने चौकशी केली. इथे काही अडचण आली तर मला कधीही उर्वरीत पान ३ वर

### कोरोना काळात बापाच्या मयतीला लोक जात नव्हते

नीलेश लंके यांनी शरदचंद्र पवार आरोग्य मंदिर सुरू करून हजारो नागरीकांना जीवदान दिले. कोरोना काळात बापाच्या मयतीला लोक गेले नाहीत. नीलेश लंके हे मात्र आरोग्य मंदिरातच झोपून कोरोना रूग्णांची सेवा करीत होते. त्यामुळे सर्वसामान्य जनतेचे त्यांना पाठबळ असल्याची प्रतिक्रीया वयोवृध्द नागरीकाने दिली.





Shree Datta Bahuuddeshiya Sanstha's
Saint Vivekanand Public School
A/P-Jamgaon, Tal-Parner, Dist-Ahmednagar
PH-9860815843, 9420812001

REQUIRED TEACHERS 2024-2025

We are looking for passionate experienced /fresher, innovative and qualified teacher with good communication skill and fluency in English for following classes.

| Sr.No. | Subject | Qualification | No.of Post |
|---|---|---|---|
| 1 | Pre-Primary | H.S.C./Graduate/D.Ted | 4 |
| 2 | Primary | H.S.C/Graduate/D.Ted /B.Ed | 3 |
| 3 | Math's | B.sc/M.sc/B.ed | 2 |
| 4 | Science | B.sc/M.sc/B.ed | 2 |
| 5 | STT | B.A./M.A.B.ed/(His/Geo) | 1 |
| 6 | English | B.A./M.A.B.Ed | 3 |
| 7 | Marathi | B.A/M.A.B.Ed | 2 |
| 8 | Hindi | B.A/M.A.B.Ed | 1 |
| 9 | Art Teacher (Drawing) | Diploma ATD | 1 |
| 10 | Administrative Staff | Compuer knowledge | 1 |

Walk-in Interview with all document on Thursday 25 April 2024 10.00 AM to 3.PM at Above Address

Note -
- Salary commensurate based on skill, qualification and Experience.
- Training will be provided to Fresher candidate who are Passionate about Education



निरोगी आरोग्याचा कानमंत्र...

# निरामय

# मिडगट व्हॉल्व्युलस हा काय आजार?

**मिडगॅट व्हॉल्व्युलस हा एक गंभीर आजार असून यामध्ये लहान किंवा मोठ्या आतड्याला पीळ बसतो. हा बसलेला पीळ कधी कधी इतका गंभीर असतो की या कारणास्तव बऱ्याच वेळा आपले आतडे पूर्णपणे ब्लॉक होते. हे सहसा आतड्यांमधील कोणत्याही प्रकारच्या कुरूपतेमुळे होते. उदाहरणार्थ, आतड्याच्या रचनेमध्ये कोणत्याही प्रकारच्या विकृती असल्यास, ते वाकू शकते.**

- काय आहे वेगळी लक्षणे? : उपचार न केल्यास रक्ताभिसरण संकुचित होऊ शकते. प्रगत आजाराच्या शारीरिक तपासणीच्या निष्कर्षांमध्ये ओटीपोटाच्या भिंतीचा एरिथेमा आणि एडेमा तसेच आतड्यांसंबंधी इस्केमिया दर्शविणारी पेरिटोनिटिसची लक्षणांचा समावेश असतो.



- निदान कसे केले जाते? : मॅरोटेशन आणि व्हॉल्वुलसच्या निदान तंत्रामध्ये शारीरिक तपासणी आणि वैद्यकीय इतिहासाव्यतिरिक्त अनेक इमेजिंग परीक्षणांचा समावेश असू शकतो. (चाचण्या ज्या शरीराच्या आतील चित्रे दर्शवतात). या चाचण्यांचा उपयोग आतड्यांमधील अडथळा पाहण्यासाठी केला जातो.
- जीआय टेस्ट सिरीज : मिडगट व्हॉल्व्युलससह मॅरोटेशनसाठी शिफारस केलेली निदान चाचणी ही एक उच्च पातळीची जीआय मालिका आहे, जी शस्त्रक्रियेच्या उपचारात विलंब झाल्यास परिणाम बिघडत नाही तोपर्यंत करणे आवश्यक आहे.
- फ्लोरोस्कोपी : जेव्हा आजाराचा संशय येतो तेव्हा बालरोगविषयक गॅस्ट्रोइंटेस्टाइनल कॉन्ट्रास्ट स्कॅनची निवड केली जाते. ते केवळ व्हॉल्व्यूलस शोधू शकत नाही, परंतु उत्स्फूर्त घट झाल्यास अंतर्निहित मलरोटेशन देखील शोधू शकते. याकडे दुर्लक्ष करणे एखाद्याला नक्कीच त्रासदायक ठरू शकते. तुम्ही तुमचा जीवही यात गमावू शकता हे लक्षात घ्या.

## मिडगॅट व्हॉल्व्युलस कशामुळे होतो?



गर्भधारणेच्या १० ते १२ आठवड्यांच्या दरम्यान भ्रूणाच्या विकासातील विकृतीमुळे आतड्यांसंबंधी विकृती निर्माण होते. मूळ फरक म्हणजे आतड्याची एक असामान्य स्थिती आहे, ज्यामध्ये ओटीपोटाच्या उजव्या बाजूला लहान आतडे आणि अस्थिबंधन विस्कळीत झाल्यामुळे डाव्या बाजूला कोलन आणि सेकम असतात. मिडगट व्हॉल्वुलस हा जरी जन्माच्या पहिल्या काही आठवड्यांमध्ये वारंवार होत असला तरी तो कोणत्याही वयात उद्भवू शकतो. व्होल्व्हुलसचे प्रारंभिक चिन्ह सामान्यतः तीव्र पित्तजन्य उलट्या, पोटाच्या वरच्या भागाचा विस्तार, पोटदुखी, हेमोडायनामिक बिघडलेल्या बाळांना आतड्यांसंबंधी मलरोटेशन तसेच व्हॉल्वुलसवर शक्य तितक्या लवकर मूल्यांकन करणे आवश्यक आहे.



# शिळ्या भातामुळे आरोग्य धोक्यात!

**भारतीय जेवणात भात, चपाती हे पदार्थ अत्यंत कॉमन आहेत. याशिवाय जेवण पूर्ण होत नाही. मात्र अनेकदा हे पदार्थ उरतात आणि त्याचेही वेगवेगळे पदार्थ बनविण्यात येतात. त्यापैकीच एक आहे भात. शिळ्या भाताचे अनेक पदार्थ बनवले जातात.**

कढी - भात, आमटी - भात, राजमा - भात अशी बेस्ट समीकरणं आपल्याला माहीत आहेत. मात्र उरलेला भात अनेकदा फ्रिजमध्ये ठेवला जातो आणि दुसऱ्या दिवशी गरम करून खाल्ला जातो. पण यामुळेच तुमच्या शरीराला जास्त नुकसान पोहचतंय हे तुमच्या लक्षात येत नाही. फ्रिजमधील भात गरम करून खाल्ल्याने पोटदुखी आणि फूड पॉईजनिंगच्या समस्यांना सामोरे जावे लागते. भात टिकविण्याची योग्य पद्धत कोणती याबाबत जाणून घेऊया...

- फ्राईड राईस सिंड्रोम : अनेकदा जेवल्यानंतर शिजलेला भात हा तासन्तास बाहेरच ठेवला जातो. मात्र रूम टेंपरेचरवर असा भात अधिक काळ राहिल्यास, त्यात बॅक्टेरिया निर्माण होऊन भात दूषित करण्याचे काम करतो. यालाच फ्राईड राईस सिंड्रोम असे म्हटले जाते.
- शिळ्या भातात बॅक्टेरिया : शिळ्या भातामध्ये सर्वात जास्त आढळणारा बॅक्टेरिया म्हणजे बॅसिलस सेरियस आहे. हा बॅक्टेरिया भात शिजवल्यानंतर बराच वेळ तसाच ठेवल्यास, अधिक प्रमाणात निर्माण होतो. त्यामुळे असा भात शरीरात गेल्यानंतर विष तयार व्हायला वेळ लागत नाही. यामुळेच पोटदुखी आणि फूड पॉईझनिंगसारख्या आजारांना बळी पडायला होतं.



- भात कसा करावा स्टोअर : भात शिजल्यानंतर त्वरीत तो वाढून टाकावा. तुम्हाला भात उरल्यानंतर स्टोअर करायचा असेल तर जास्त वेळ बाहेर राहू देऊ नका. तुम्ही एक तासाच्या आत फ्रिजमध्ये हा भात ठेवा. लक्षात ठेवा, हा भातदेखील तुम्ही एक दिवसापेक्षा अधिक काळ ठेऊ नका.
- शिळा भात किती वेळात खावा? : शिळा भात गरम करून सकाळी तुम्ही दुसऱ्या दिवशी खाऊ शकता. मात्र त्यानंतर दोन दिवसांचा शिळा भात खाऊ नये. यामुळे पोटदुखी होऊ शकते. इतकंच नाही तर यामुळे पोटात विष तयार होऊन तुम्हाला अधिक त्रास होऊ शकतो.



# तिशीनंतर शरीर हळूहळू थकत जातं

## महिलांनो, वेळीच सावध व्हा....

**स्त्री असो की पुरुष, वयाच्या ३० वर्षांनंतर प्रत्येकाचे शरीर प्रतिसाद देऊ लागते. या वयानंतर शरीर हळूहळू थकू लागतं आणि वृद्धत्वाचा प्रभाव हळूहळू दिसू लागतो. एवढेच नाही तर या वयानंतर हृदयविकार, मधुमेह, कर्करोग, ऑस्टिओपोरोसिस, ॲनिमिया आणि थायरॉईड यांसारख्या गंभीर आजारांचा धोकाही वाढतो. हे वय विशेषतः महिलांसाठी एक महत्त्वाचा टप्पा आहे. कारण या काळात करिअर, कुटुंब, मुले आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या या सर्वांची काळजी घ्यावी लागते. साहजिकच या सर्वांचा आरोग्यावर गंभीर परिणाम होतो. इतकं काम करायचं तर शरीरात प्राण असणं खूप गरजेचं आहे. वयाच्या ३० व्या वर्षी जर तुम्ही खाण्यापिण्याची काळजी घेतली नाही तर तुमचे शरीर वेळेआधी अशक्त आणि म्हातारे होऊ लागते. प्रथिने, जीवनसत्त्वे, फायबर, कॅल्शियम, मॅग्नेशियम आणि लोह यासारखे सर्व आवश्यक पोषक घटक चांगल्या आरोग्यासाठी आवश्यक आहेत.**

### कॅल्शियम हाडांना जीवदान देईल

३० वर्षांच्या स्त्रियांसाठी हाडांच्या समस्या सामान्य झाल्या आहेत. जसजसे तुमचे वय वाढते, तुमची इस्ट्रोजेन पातळी कमी होते, ज्यामुळे तुमची हाडे कमकुवत होतात. त्यामुळे यावेळी व्हिटॅमिन डीसोबत कॅल्शियमचे सेवन वाढवणे आवश्यक आहे. महिलांना दररोज सुमारे १००० मिलीग्राम कॅल्शियमची आवश्यकता असते. कॅल्शियमच्या चांगल्या स्त्रोतांमध्ये दूध, दही, चिया बिया, कॉटेज चीज, ब्रोकोली, बदाम, बोक चॉय इत्यादींचा समावेश होतो.

### अँटिऑक्सिडेंट समृध्द अन्न

मुक्त रॅडिकल्स ऊतींचे वृद्धत्व वाढवण्याचे काम करतात आणि त्यांचा सामना करण्यासाठी आणि त्यांना काढून टाकण्यासाठी अँटिऑक्सिडंट-समृद्ध पदार्थांचे सेवन करणे आवश्यक आहे. यासाठी तुम्ही ग्रीन, ब्लॅक टी आणि कॉफी घेऊ शकता कारण त्यात अँटिऑक्सिडेंट असतात. याशिवाय तुम्ही तुमच्या आहारात काळ्या तांदळाचाही समावेश करू शकता.

### या गोष्टी आहारात आवश्यक

- या वयानंतर बीपी वाढण्याचा धोका असतो, त्यामुळे पोटॅशियमयुक्त पदार्थ जसे की बटाटे, बीन्स आणि टोमॅटो भरपूर प्रमाणात खावेत.
- तुम्ही भरपूर प्रथिनेयुक्त पदार्थ खावेत, यासाठी भरपूर चीज, अंडी, चिकन, पीनट बटर आणि शेंगा खाव्यात.
- हृदय निरोगी ठेवण्यासाठी आणि हृदयरोग टाळण्यासाठी ओमेगा -3 फॅटी ॲसिड आवश्यक आहे, यासाठी तुम्ही मासे, अक्रोड, चिया बिया आणि भांगाच्या बियांचे सेवन करावे.
- या वयात तुम्ही अधिक वनस्पती आधारित अन्न खावे आणि भरपूर पाणी प्यावे.

### अन्नातील फायबरचे प्रमाण

या वयात तुम्ही तुमच्या आहारातील फायबरचे प्रमाण वाढवावे. रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यासाठी आणि चयापचय व्यवस्थापित करण्यासाठी फायबर आवश्यक आहे. या वयात वजन झपाट्याने वाढू लागते, त्यामुळे तुम्ही तुमच्या आहारात अधिकाधिक फायबरयुक्त फळे आणि भाज्यांचा समावेश करावा.



### हार्मोन्स संतुलित करणारे पदार्थ

या वयात संप्रेरकांच्या कार्यामध्ये बदल सुरू होतात, ज्याची चांगल्या प्रकारे देखभाल करणे आवश्यक आहे. यासाठी तुम्ही तज्ज्ञांच्या सल्ल्याने अश्वगंधा, तुळशी आणि माकडाच्या मुळाचे चूर्ण घेऊ शकता. हे हार्मोन्सची पातळी राखण्यास मदत करतात. याशिवाय ब्रोकोली, सफरचंद, सूर्यफुलाच्या बिया, ग्रीन टी, ब्लू बेरी आणि भोपळ्याच्या बिया यासारख्या गोष्टींचे सेवन वाढवावे.

### लोहयुक्त पदार्थ

थकवा आणि अशक्तपणा ही अशक्तपणाची लक्षणे आहेत आणि या वयात महिलांमध्ये अशक्तपणा मोठ्या प्रमाणात दिसून येतो. अशक्तपणा टाळण्यासाठी आणि शरीरात रक्त तयार करण्यासाठी, तुम्ही बीन्स, वाटाणे, भोपळ्याच्या बिया, हिरव्या भाज्या, लाल मांस, कोंबडी आणि मनुका इत्यादी लोहयुक्त पदार्थांचे सेवन केले पाहिजे.

### आयोडीन आणि फोलेट

जर तुम्ही वयाच्या ३० वर्षांनंतर बाळाची योजना करत असाल, तर तुम्ही गर्भधारणेची गुंतागुंत टाळण्यासाठी आणि गर्भधारणेदरम्यान तुमच्या आणि बाळाच्या सुरक्षिततेसाठी आयोडीन, लोह आणि फोलेटची पूर्ण काळजी घेतली पाहिजे. यासाठी तुम्ही भरपूर बीन्स, हिरव्या पालेभाज्या जसे पालक आणि लिंबूवर्गीय फळे इत्यादींचे सेवन करावे.

# घर-काम-प्रवास... ५ टिप्स!

**अनेकदा Working Women आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करत असते. अशावेळी लठ्ठपणा, डायबिटिस, सांधेदुखी, हाय बीपी सारख्या समस्यांना सामोरं जावं लागतं. हल्ली कुटुंबातील स्त्री-पुरूष दोघंही कामाला असतात. अशावेळी घरातील महिला प्रत्येकाची काळजी घेते मात्र स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करते. Working Women ने स्वतःच्या आरोग्याची काळजीही तितकीच घेतली पाहिजे. घर-काम-प्रवास असा दिनक्रम असलेल्या महिलांनी ५ टिप्स नक्की फॉलो करा. यामुळे तुमचं आरोग्य सुदृढ राहण्यास मदत होते.**

### पुरुषांची महिलांना स्वयंपाकघरात मदत

कुटुंबातील स्त्री-पुरूष आज दोघंही कामाला जातात. अशावेळी कुटुंबातील संपूर्ण जबाबदारी दोघांची आहे. मग तो स्वयंपाक का असेना. ऑफिसमधून येऊन पुन्हा कुटुंबासाठी स्वयंपाक करताना महिलांची तारेवरची कसरत होते. अशावेळी त्या स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष देतात. अशावेळी महिलांना जोडीदाराची साथ असेल तर ते दोघंही स्वयंपाक करू शकतात आणि बाहेरचं खाणं टाळलं जाऊ शकतं.

### अध्यां तासानंतर किमान ३ मिनिटांचा ब्रेक

ऑफिसमध्ये सतत एकाचजागी बसून महिलांचा लठ्ठपणा वाढतो. लठ्ठपणा हा अनेक आजारांना आमंत्रण देत असतं. अशावेळी त्या कामाच्या तासातही महिला आपलं आरोग्य राखू शकतात. जसे की, दर अर्ध्यातासानंतर किमान ३ मिनिटांचा ब्रेक. या ब्रेकमध्ये तुम्ही चालू शकता तसेच दोन्ही पायांवर नीट उभे राहू शकता. यामुळे रक्ताभिसरण व्यवस्थित होते.

### मांडी घालून खाली बसा

रोज उभं राहून स्वयंपाक, प्रवास आणि त्यानंतर ऑफिसमध्ये बसून राहणे. यामुळे पायावर अतिशय ताण पडतो. अशावेळी वर्किंग वुमनला शक्य झाल्यास तिने ऑफिसमध्ये मांडी घालून खाली बसा. तसेच जेवतानाही मांडी घालून बसावे यामुळे जेवण व्यवस्थित होते आणि आहार शरीरासाठी फायदेशीर असते.

### बॅगेत काय असायला पाहिजे...

वर्किंग वुमनच्या बॅगेत असंख्य गोष्टी असतात. यामध्ये चार गोष्टींचा आवर्जून समावेश करा. काजू, ज्यात आर्यन, कॅल्शियम, मॅग्नेशियम असते. तसेच सहज बॅगेत असल्यामुळे छोटीशी भूक भागवण्यास मदत होते. काजूचा स्किन चांगली राहण्यास मदत होते. मन चांगल, प्रसन्न राहतं. दही ताक हे पदार्थ देखील छोटीशी भूक भागवू शकतात. यामुळे वजन कमी करण्यासही मदत होते. तसेच उन्हाळ्यात शरीरात गारावा राहतो. दही-ताकाचे आरोग्यदायी देखील असंख्य फायदे आहेत.



### कशी भागवाल छोटी भूक?

- केळ : केळदेखील आरोग्यदायी फायदे आहेत. उपाशी न राहता छोटी भूक भागवण्यास केळ खाऊ शकतात. पचनापासून ते त्वचेपर्यंत सगळ्यासाठी गुणकारी. शरीरातील रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवण्यास मदत होते.
- शेंगदाणे : गूळ हे ब्लड सर्क्युलेश कंट्रोल करून शरीराला हार्टच्या समस्येपासून वाचवणे, कॅल्शियम, व्हिटॅमिन A आणि प्रोटीन मसल्स टोंड करण्यास मदत करते.

### विनाकारण हसत किंवा रडत असाल तर...

*प्रोजेस्टेरॉनच्या कमतरतेची लक्षणे या हार्मोनच्या कमतरतेमुळे अनियमित मासिक पाळी, डोकेदुखी, मूड बदलणे, झोप न लागणे, वजन वाढणे, गर्भधारणा न होणे, गर्भपात, थकवा यासारख्या समस्या उद्भवू शकतात.*

- *केळे : केळीमध्ये मॅग्नेशियम भरपूर असते, जे प्रोजेस्टेरॉन हार्मोन तयार करण्यास मदत करते. मॅग्नेशियम पिट्यूटरी ग्रंथीचे नियमन करण्यास देखील मदत करते, जे हार्मोनचे उत्पादन कंट्रोल करण्यासाठी महत्त्वपूर्ण असते.*
- *अक्रोड : अक्रोडमध्ये प्लांट स्टेरॉल्स असतात, जे स्त्रियांमध्ये प्रोजेस्टेरॉनच्या उत्पादनास प्रोत्साहन देऊ शकतात. अक्रोडमध्ये व्हिटॅमिन बी 6 देखील भरपूर असते आणि हे जीवनसत्व प्रोजेस्टेरॉनचे उत्पादन वाढवण्यास देखील मदत करते.*
- *भेंडी : भेंडीला ओकरा असेही म्हणतात. जे मॅग्नेशियम आणि झिंकचा समृद्ध स्त्रोत आहे. प्रोजेस्टेरॉन हार्मोन संतुलित करण्यासाठी हे दोन्ही पोषक घटक आवश्यक आहेत.*
- *भोपळ्याच्या बिया आणि बदाम : भोपळ्याच्या बियांमध्ये भरपूर झिंक असते, जे प्रोजेस्टेरॉनचे उत्पादन करण्यास मदत करते. त्याचवेळी, मॅग्नेशियम आणि व्हिटॅमिन ई बदामामध्ये आढळतात, हे दोन्ही पोषक प्रोजेस्टेरॉन हार्मोन वाढवतात.*

## शॉर्ट न्यूज

### श्रीरामपूरमध्ये मतदार जागृतीसाठी स्वाक्षरी मोहीम

**श्रीरामपुर :** लोकसभा सार्वत्रिक रणधुमाळी देशभरात मध्यावर आली आहे. मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी श्रीरामपूरच्या मतदार नोंदणी अधिकारी कार्यालयाकडून स्वीप विभागाकडून मोठ्या प्रमाणात जनजागृती केली जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून श्रीरामपूर नगरपरिषदेच्या लोकमान्य टिळक वाचनालयासमोरील आझाद मैदानात मी मतदान करणार, माझे मत माझे भविष्य या धर्तीवर मतदारांची स्वाक्षरी मोहीम राबविण्यात आली. शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी स्वाक्षरी मोहीम राबविण्यात आल्याने यास विशेषतः नवमतदारांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

### शालेय स्पर्धा परीक्षेत श्रीगोंदा तालुक्याचा डंका

**श्रीगोंदा :** नॅशनल मीन्स कम-मेरिट स्कॉलरशिप (एन एम एम एस) तसेच सारथी या सारख्या शालेय स्पर्धा परीक्षेत श्रीगोंदा तालुक्याने डंका वाजविला. एन एम एम एस परीक्षेत तालुक्यातील एकूण ५९ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झाले आहेत. तर सारथी परीक्षेत २९४ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती मिळवले आहे. तर सारथी (मंथन प्रज्ञाशोध परीक्षा) परीक्षेत श्रीगोंदा शहरातील जिल्हा परिषदेच्या मुले तसेच मुलींच्या शाळेतील १११ विद्यार्थीनी यश मिळाले आहे.

### वाकचौरेंचा कॉर्नर सभेतून प्रचाराचा धडाका

**शिर्डी :** मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे शिवसेना (उबाठा) पक्षाचे उमेदवार भाऊसाहेब वाकचौरे यांच्या प्रचाराचा धडाका सुरू झाला आहे. नेवासा तालुक्यात विविध ठिकाणी कॉर्नर सभा पार पडल्या. या सभांना मोठा प्रतिसाद मिळाला. नेवासा पंचायत समितीच्या माजी सभापती सुनीता गडाख यांनी चांदा जिल्हा परिषद गटात माकासह तेलकुडगावात कॉर्नर सभा घेतल्या. यावेळी मतदारांना महाविकास आघाडीचे उमेदवार भाऊसाहेब वाकचौरे यांना मोठ्या मताधिक्याने मतदान करून निवडून देण्याचे आवाहन केले. यावेळी शिवसेना पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्ते उपस्थित होते.

### भरधाव कारने मायलेकींना उडवले

**पारनेर :** बेल्हे रोडवर देवीभोयरे फाट्यानजीक डेअरीजवळ एका पांढऱ्या रंगाच्या कारने मयत प्रतीक्षा सोनवणे हिच्याबजाज कंपनीच्या बॉक्सर मोटारसायकल. (एम एच १६ पी ३३९८), हिला समोरून जोरात धडक दिल्याने प्रतीक्षा गोरख सोनवणे (वय २३), रा. पुणेवाडी, ता. पारनेर ही गंभीर जखमी झाली, तिला उपचाराकरता पारनेर येथे ग्रामीण रुग्णालयात आणले असता, तिला मयत घोषित करण्यात आले तर प्रतीक्षा हिची आई (नाव समजले नाही) गंभीर जखमी झाली. या बाबत मयत प्रतिक्षा सोनवने हिचे वडील गोरख यादव सोनवने यांनी पोलिसांत फिर्याद दिली आहे.

### जुगार अड्ड्यांवर पोलिसांचे छापे

**नेवासा :** तालुक्यातील खेडले परमानंद येथे आणि महालक्ष्मीहिवरे सोनई पोलिसांनी मटका अड्ड्यावर छापा टाकून दोघांविरुद्ध कारवाई केली. छाप्यात जाकीर रशीद शेख हा जुगारासाठी लोकांकडून पैसे घेऊन चिठ्ठयांवर आकडे लिहून देऊन खेळताना आढळून आला. याबाबत पोलीस कॉन्स्टेबल गोरक्षनाथ जावळे यांनी फिर्याद दिली. तर दुसरा छापा महालक्ष्मीहिवरे येथील मटका अड्ड्यावर मटक्यासाठी लागणारे साहित्य जप्त केले. पोलीस कॉन्स्टेबल ज्ञानेश्वर आघाव यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन मुरलीधर कोंडीबा कानडे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# गोसेवा आयोगाची स्थापना करणारे महाराष्ट्र एकमेव राज्य

## पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची माहिती



**नगर : प्रतिनिधी**

**गो मातेच्या रक्षणासाठी राज्यात गोसेवा आयोगाची स्थापना करण्यात आली. अशा प्रकारचा आयोग स्थापन करणारे महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य असल्याची माहीती महसुल, पशुसंवर्धन व दूग्ध व्यवसाय विकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.**

नगर शहरातील गो रक्षण करणारे कार्यकर्ते तसेच हिंदुत्ववादी संघटनांच्या प्रतिनिधींशी मंत्री विखे पाटील यांनी संवाद साधला. तसेच गोरक्षणाबाबत काम करताना येत असलेल्या अडचणीही त्यांनी जाणून घेतल्या.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रेरणेतून आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात गोसेवा आयोग स्थापन करुन, गो मातेचे रक्षण आणि संवर्धन करण्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण पाऊल टाकले गेले. केंद्र सरकारने राष्ट्रीय स्तरावरील गोसेवा आयोग स्थापन केला. त्याच धर्तीवर राज्य गोसेवा आयोग स्थापन करणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य ठरले असल्याचे त्यांनी सांगितले.

शहरातील हिंदुत्ववादी संघटनांच्या प्रतिनिधींनी गोमातेच्या संरक्षणासाठी काम करताना येत असलेल्या अडचणीही मंत्र्यासमोर विषद केलेल्या अडचणींची गांभिर्याने दखल घेण्याची ग्वाही मंत्री विखे पाटील यांनी दिली. या बैठकीस सकल हिंदु समाजाचे प्रतिनिधी, विश्व हिंदु परिषद, बजरंग दलाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

(पान १ वरून)

### गुजरातच्या २ हजार टन कांद्यासाठी निर्यात बंदी उठवली

शिक्का मारून प्रचार केला जात आहे,' अशी टीका त्यांनी केली. वैयक्तिक टीकेमुळे देशाच्या विकासाच्या मुद्द्यापासून आपण फारकत घेत आहोत, अशी पुस्ती त्यांनी जोडली. पाच वर्षांपूर्वी एकाला निवडून दिल्याच्या राष्ट्रवादीतील कार्यकर्त्यांच्या व्यथा मी आता ऐकत आहे. अडचणीत धावून जावे, दोन शब्द प्रेमाने बोलावे, जमले तर विकास करावा, अशी सर्वसामान्यांची अपेक्षा असते. हे महाशय मात्र पाच वर्षे फिरकले नाही, असे आढळराव म्हणाले.

### आरक्षणाच्या विरोधकांना पूर्ण ताकदीने पाडा !

मात्र रुग्णवाहिकेतून जालन्यात पोहचून त्यांनी मतदान केले. यावेळी त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला आहे.

मराठ्यांनी एकजूट दाखवावी

जरांगे यांनी यावेळी महाविकास आघाडीसह महायुतीवर टीका केली आहे. ते म्हणाले, आपला उमेदवार निवडणुकीत नसल्यामुळे सगेसोयरे आणि मराठा आरक्षणाच्या बाजूने आहेत त्यांना मतदान करा. तसेच जे मराठा आरक्षणाच्या विरोधकात आहेत त्यांना इतक्या ताकदीने पाडा की त्यांच्या कमीत कमी पाच पिढ्या निवडणुकीला उभ्या राहिल्या नाही पाहिजे. या निवडणुकीच्या निमित्ताने मराठ्यांनी एकजूट दाखवावी, असे जरांगे म्हणाले.

८ जूनपासून पुन्हा आमरण उपोषणाला बसणार

याशिवाय ४ जूनपासून बाजी लावणार आहे. ६ जूनपर्यंत आरक्षण न दिल्यास मी ८ जूनपासून पुन्हा आमरण उपोषणाला बसणार आहे असा इशारा जरांगे यांनी दिला आहे. ते म्हणाले, सर्वांनी आमचे वाटोळे केले आहे. पण लोकाशाहीचा हक्क बजवायला पाहिजे. मी पुन्हा आंदोलन करणार आहे. माझे शरीर साथ देत नसले तरी मी मरणाला घाबरत नाही. समाजाने काळजी करू नये. मी खंबीर आहे. आशीर्वाद आणि साथ द्या, असे जरांगे म्हणाले.

लोकशाहीच्या उत्सवासाठी मतदान करा

याशिवाय, अंतरवालीजवळ दोन ते तीन किलोमीटर अंतरावर मतदान केंद्र आहे. लोकशाहीचा हा मोठा उत्सव आहे. आपण मतदान केले पाहिजे. माझं मराठा आणि महाराष्ट्रातील लोकांना आवाहन आहे की, सर्वांनी १०० टक्के मतदान करा. लोकशाहीच्या उत्सवासाठी मतदान केलं पाहिजे, असे आवाहन जरांगे यांनी राज्यातील मतदारांना केले आहे.

### नीलेश लंके सकाळीच जॉगिंग ट्रॅकवर!

सांगा नीलेश लंके साहेबांचे ५०० कार्यकर्ते जमा होतील. पालघर येथे नीलेश लंके प्रतिष्ठाणचे कार्यालय आहे. हा लंके साहेबांचा मोठेपणा आहे. लंके साहेबांची मला फार मदत झालेली आहे. मी नोकरदार माणूस आहे. राजकारणाशी माझा संबंध नाही तरीही लंके साहेबांचा परोपकार महत्वपुर्ण असल्याचे त्यांनी सांगितले.

### माळशेज रेल्वे कृती समितीचा लंके यांना पाठींबा

परिसरात पर्यटन उद्योग वाढेल व त्यातून रोजगार निर्मिती होईल असा या समितीला विश्वास आहे. या रेल्वेमार्गासाठी स्व. खा. प्रकाश परांजपे, स्व. गोपीनाथ मुंडे, मधुकरराव पिचड, अजितदादा पवार, सुप्रियाताई सुळे, प्रमोद हिंदूराव यांच्यासह अनेक मान्यवरांनी सक्रीय साथ दिल्याचे निवेदनात नमुद करण्यात आले आहे.

# अचूक भविष्य वर्तवा आणि एकवीस लाख रूपये जिंका!

## राज्यातील ज्योतिष्यांना अंनिसकडून अनोखं चॅलेंज

**पुणे : प्रतिनिधी**

**सध्या सगळीकडेच लोकसभेच्या निवडणुकीची रेलचेल सुरु आहे. त्यात अनेक नेते आपलं नशीब आजमावणार आहे. याच निवडणुकीत अनेक नेते ज्योतीष्यांचादेखील सल्ला घेतात आणि आपली राजकीय वाटचाल ठरवताना दिसतात. मात्र याच ज्योतिष्यांना अंनिसकडून ओपन चॅलेन्ज देण्यात आलं आहे. लोकसभा निवडणूक निकालाचे अचूक भविष्य वर्तवा आणि एकवीस लाख रूपये जिंका, असे आव्हान महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने ज्योतिषांना केलं आहे.**



सध्या देशभरात लोकसभा निवडणुकांची रणधुमाळी चालू आहे. अनेक राजकीय नेते देखील या फसवणुकीला बळी पडतात, त्यामुळे अज्ञानी आणि भाबडया लोकांमध्ये गैरसमज पसरतात आणि अंधश्रध्दा निर्माण होतात. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समितीने देशातील सर्वच ज्योतिषांना निवडणूक निकालाचे अचूक भविष्य वर्तवून एकवीस लाख रुपये बक्षीस जिंकण्याचे आव्हान दिले आहे, अशी माहिती अनिसने दिली आहे. त्यासाठीची आव्हान प्रक्रिया आणि प्रश्नावली देखील महाराष्ट्र अंनिसने जाहीर केली आहे. हे आव्हान राजकीय अंदाज वर्तवणाऱ्या राजकीय अभ्यासकांना नाही तर ज्योतिष्यशास्त्राचा आधार घेऊन राजकीय भविष्य सांगणाऱ्या ज्योतिषांना आहे. यासाठी पाच प्रश्न असणारे आहेत. त्याची अचूक देणं गरजेचं असणार आहे. त्या पाच मधील एक प्रश्न संविस्त असेल. या स्पर्धेसाठी काही नियम आणि अटी लागू करण्यात आल्या आहेत.

**अटी नेमक्या कोणत्या आहेत?**

१) प्रवेशिका आणि उत्तरे तसेच अंधश्रध्दा निर्मूलन समिती, महाराष्ट्र या नावे काढलेला रुपये ५००० (रुपये पाच हजार ) प्रवेशशुल्काचा धनादेश (डी.डी.) सीलबंद पाकीटातून २५ मे २०२४ पर्यंत रजिस्टर पोष्टाने खालील पत्त्यावर मिळणे बंधनकारक आहे.

२)प्रवेशिका, प्रश्नावली आणि नियमावलीसाठी राहुल थोरात, व्यवस्थापकीय संपादक अनि वार्तापत्र कार्तिक अपार्टमेंट, एफ-४, सहारा चौक, संजयनगर, सांगली ४१६४१६.फोन नंबर-०२३३-२३१२५१२यांचेशी संपर्क करावा.

३)प्रवेशिका आणि प्रश्नावली मधील माहिती स्वतःच्या हस्ताक्षरामध्ये अथवा टाईप केलेली असावी.

४)आव्हान प्रक्रियेसाठी निर्णय अधिकारी म्हणून तज्ज्ञ परीक्षक समिती कार्यरत असेल, परीक्षक समितीचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

५)ज्योतिष आव्हान प्रक्रियेसाठीच्या बक्षीसाची रक्कम रुपये एकवीस लाख असेल.

६ ) एका व्यक्तीची एकच प्रवेशिका स्पर्धेसाठी पात्र असेल,

७)प्रश्नावली शंभर गुणांची असेल. प्रत्येक प्रश्नाच्या अचूक उत्तराला पाच गुण असेल. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर देताना ते उत्तर ज्योतिषाची कोणती पद्धत आणि कशी वापरून काढले याची सविस्तर माहिती देणे अत्यावश्यक आहे. या माहितीसाठी अर्धे गुण असतील आणि अर्धे गुण उत्तरासाठी असतील.

८) संख्यात्मक अथवा टक्केवारीतील प्रश्नांसाठीच्या उत्तरामध्ये दोन किंवा दोनपेक्षा अधिक संख्या असतील तर आपले उत्तर ग्राहय धरले जाणार नाही. उदा. एखादया पक्षाला १०० ते १२० जागा मिळतील असे न लिहिता, अचूक आकडा ११२ असा लिहिलेला असावा.

९) निवडणुकीचे भविष्य वर्तवण्यासाठी लागणारे संपूर्ण साहित्य सहभागी प्रवेशिकाकर्त्याने स्वतः उपलब्ध करावयाचे आहे.

१०)शंभर गुण मिळवणारा स्पर्धक बक्षीसास पात्र असेल. एकापेक्षा अधिक स्पर्धकांनी शंभर गुण संपादन केल्यास बक्षीसाची रक्कम समान प्रमाणात विभागून दिली जाईल.

११) आव्हान प्रक्रियेच्या संबंधातील आक्षेप, वाद व हरकतींचे न्यायालयीन कामकाज सांगली न्यायालयाच्या कार्यकक्षेत असेल.

१२) उमेदवार दोन मतदारसंघातून निवडणूक लढवित असल्यास उत्तर कोणत्या मतदारसंघाशी संबंधित आहे ते उमेदवाराच्या नावापुढे नमुद करावे अन्यथा आपली प्रश्नावली बाद ठरवण्यात येईल

१३) या प्रक्रियेसाठी निवडणूक आयोगाच्या अधिकृत वेबसाईटवरील निवडणूक निकाल आणि आकडेवारी ग्राहय धरण्यात येईल.

१४) भविष्य वर्तवण्यासाठी कोणती पध्दत वापरली, हे प्रवेशिकेत नमूद करणे आवश्यक आहे. अन्यथा आपली प्रश्नावली ग्राहय धरण्यात येणार नाही.

१५) निवडणूक आयोगाने अधिकृतपणे सर्व निकाल त्यांच्या संकेतस्थळावर जाहीर केलेनंतर परीक्षक समितीच्या योग्य त्या तपासणीनंतर आव्हान प्रक्रियेचा निकाल दोन आठवडयात जाहीर करण्यात येईल.










# सुपा शहराला मिळणार रोज तीन लाख लिटर पाणी

## ■ पालकमंत्र्यांच्या संबंधित विभागाला सुचना ■ ग्रामस्थांना दिलासा



**सुपा : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील सुपा ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी पाण्याच्या समस्येबाबत पालकमंत्र्यांना अवगत केल्यानंतर पालकमंत्र्यांनी संबंधित विभागाला सुचना देताच चोवीस तासात कारवाई झाली व सुपा शहरासाठी रोज तीन लाख लिटर पाणी मिळण्यास सुरवात झाली आहे.**

जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील बुधवारी पारनेर तालुक्याच्या दौऱ्यावर आले असता सुपा गावच्या सरपंच व ग्रामपंचायत सदस्यांनी नामदार विखे पाटील यांना सुपा गावच्या पाणी प्रश्नाबाबत सविस्तर माहिती दिली व विसापुर पाणी योजना चालू होईपर्यंत सुपा औद्योगिक वसाहतीतून सुपा गावासाठी नियमित पाणी सोडावे अशी विनंती ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आली.

पालकमंत्री विखे यांनी सुपा ग्रामस्थांच्या मागणीचा सहानुभूती पुर्वक विचार करत तात्काळ औद्योगिक वसाहतीच्या अधिकाऱ्यांना सुचना केल्या व लगेचच उद्यापासुन सुपा गावासाठी आवश्यक व त्यांच्या मागणीइतके पाणी द्यावे असे सांगितले.

सुपा शहरासाठी औद्योगिक वसाहतीतुन पाणी सोडावे यासाठी सरपंच सौ. मनिषा योगेश रोकडे, माजी उपसरपंच दत्तात्रय पवार, सागर मैड,पप्पू पवार, प्रताप शिंदे, सुरेश नेटके, सदस्या अनिता पवार, युवा नेते योगेश रोकडे यांनी सुप्याची नोंदणीकृत लोकसंख्या व आज रोजी सुप्यात वास्तव्यास असलेले नागरिक यांची तफावत पालकमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली. यामुळे पालकमंत्र्यांनी तात्काळ औद्योगिक वसाहतीच्या अधिकार्यांना पाणी सोडण्याच्या सूचना दिल्या.

गुरुवारी रविंद्र थोटे उपअभियंता औद्योगिक वसाहत पाणी पुरवठा विभाग यांनी सुपा येथे येत औद्योगिक वसाहतीतील टाकीत एकून येणारे पाणी, वाटप होणारे एकून पाणी व शिल्लक पाणी याचा हिशेब पहात सुपा शहरासाठी रोज तीन लाख लिटर पाणी सोडण्याचे नियोजन केले. गुरुवारी ग्रामपंचायत पदाधिकारी कर्मचारी औद्योगिक वसाहत पाणीपुरवठा अधिकारी यांनी सुपा शहरासाठी पाणी सोडले. यावेळी युवा नेते योगेश रोकडे, उपअभियंता रविंद थोटे, पप्पु पवार, हरिषचंद्रे, विजय रासकर, सुरेंद्र शिंदे, सलीम तांबोळी, रफिक शेख आदी यावेळी उपस्थित होते.

सुपा शहरात नोंदणीकृत लोकसंख्या व सद्यस्थितीत रहिवाशी संख्या यांत मोठी तफावत आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीला नागरी सुविधा पुरवताना मोठी कसरत करावी लागत असते तिच अवस्था पाणी पुरवठ्याचीही आहे सुप्याची पाण्याची गरज पाहुन ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी बुधवारी पारनेर दौऱ्यावर आलेल्या पालकमंत्री विखे पाटील यांना समस्या सांगितली व यावर तात्काळ कारवाई होत सुपे करांना चोवीस तासाच्या आत आवश्यक तेवढे पाणी मिळण्यास सुरुवात झाली. सुप्याची पाण्याची समस्या पहाता युवा नेते योगेश रोकडे यांनी आपल्या सहकार्यासह वरिष्ठ पातळीवर पाठपुरावा केला होता अखेर बुधवारी पालकमंत्री विखे पाटील सुप्यात आले असता त्यांनी संबंधित विभागाला सूचना केल्या व सुपेकरांना पाणी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.

# हिवरे बाजार मॉडेल नेपाळमध्ये राबविणार!

## नेपाळचे वरिष्ठ अभियंता रमेशकुमार मंडल यांचे प्रतिपादन

**हिवरे बाजार : प्रतिनिधी**

**हिवरे बाजार येथे नुकतीच नेपाळ देशातील मंत्रालयातील पाणीपुरवठा व जलसंधारण विभागाच्या २६ अधिकाऱ्यांनी नेपाळ सरकार व जलशक्ती मंत्रालय ,जल संशोधन ,नदी विकास औगा संरक्षण विभाग केंद्रीय जल आयोग राष्ट्रीय जल अकादमी भारत सरकार यांच्या विद्यमाने आदर्श गाव हिवरे बाजारला प्रक्षेत्र भेट दिली.**




याप्रसंगी त्यांना पद्मश्री पोपटराव पवार यांनी हिवरे बाजार गावातील संपूर्ण विकास कामांची माहिती दिली. नेपाळ सरकारचे वरिष्ठ अधिकारी रमेशकुमार यांनी आपले मत व्यक्त करताना सांगितले, हिवरे बाजारचा अनुभव नक्कीच उपयोगात येईल.नेपाळ व हिवरे बाजारच्या भौगोलीक रचनेत बदल आहे परंतु हिवरे बाजारने लोकसहभागातून पिक व पाणी व्यवस्थापन केल्यामुळेच हे व्यवस्थित होऊ शकते. हिवरे बाजारमध्ये पाण्याच्या पुनर्भरणापासून ते मातीचे आरोग्य यांची दक्षता घेण्याची गरज आहे.भविष्यकाळात आरोग्यदायी पाणी व अन्नाची गरज आहे ते इथे हिवरे बाजारला पहायला मिळाले.

नेपाळमध्ये १२०० मि.मि.पाऊस पडूनसुध्दा पाण्याच्या समस्येला तोंड द्यावे लागते.याउलट हिवरे बाजारमध्ये ४०० मी.मी.पाऊस पडतो तरीसुध्दा लोकसहभागातून पाण्याच्या ताळेबंदावर आधारित उत्तम प्रकारचे पिक व पाणी व्यवस्थापनमुळे पाणीटंचाई जाणवत नाही.

यावेळेस मिलिंद पानपाटील संचालक राष्ट्रीय जल अकादमी,एस.सेन्थिल सहा. संचालक राष्ट्रीय जल अकादमी यांचेमार्फत भेटीचे नियोजन करण्यात आले होते.नेपाळ देशातील टेक नाथ दहाल सहसचिव तसेच विविध खात्याचे अभियंते,कक्षप्रमुख व अर्थ विभागातील प्रमुख असे एकूण २६ व्यक्तीचा समावेश होता.प्रसन्न पवार ,हबीब सय्यद यांनी हिवरे बाजार येथील कामांची माहिती दिली.

# भूमिपुत्र शेतकरी संघटनेची मंगळवारी जिल्हा बैठक

## राजकीय भूमिका स्पष्ट करणार



**नगर : प्रतिनिधी**

**शेतकरी व कष्टकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी लढणारी संघटना भूमिपुत्र शेतकरी संघटना या संघटनेच्या माध्यमातून अनेक प्रश्न व समस्या सर्वसामान्य जनतेच्या आजपर्यंत मार्गी लागल्या आहेत. संघटनेची राजकीय भूमिका स्पष्ट करण्यासाठी मंगळवार दि. ३० एप्रिल रोजी अहमदनगर येथे जिल्हा बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संतोष वाडेकर यांनी दिली.**

राज्यात ठीक ठिकाणी व अहमदनगर जिल्ह्यात भूमिपुत्र शेतकरी संघटनेची मोठी ताकद आहे. आंदोलनात्मक भूमिकेच्या माध्यमातून नेहमीच सकारात्मक लढाई लढणारी संघटना म्हणून भूमिपुत्र शेतकरी संघटनेला संपूर्ण राज्यात ओळखले जाते.

सध्या देशात लोकसभा निवडणुका होऊ घातल्या आहेत. शिर्डी लोकसभा मतदार संघामध्ये शिवसेना उद्धव ठाकरे गटाकडून भाऊसाहेब वाकचौरे विरुद्ध शिवसेना एकनाथ शिंदे गटाकडून सदाशिव लोखंडे तसेच नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघांमध्ये भारतीय जनता पार्टीचे डॉ. सुजय विखे विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे निलेश लंके लोकसभेच्या रिंगणात एकमेकांसमोर उभे आहेत.

या निवडणुकीत कोणासोबत जायचे कोणाला पाठिंबा द्यायचा कोण सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवणार या संदर्भात चर्चा विनिमय करण्यासाठी आणि आपली राजकीय भूमिका स्पष्ट करण्यासाठी भूमिपुत्र शेतकरी संघटनेच्या वतीने जिल्हा बैठकीचे आयोजन अहमदनगर या ठिकाणी करण्यात आले आहे या बैठकीमध्ये संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत विचारविनिमय करून व त्यांच्या मताशी सहमती घेऊन पुढील निर्णय घेण्यात येणार असल्याची माहिती भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संतोष वाडेकर यांनी दिली आहे.

# अहंकार सर्वात मोठा दुर्गुण - डॉ. विकासानंद मिसाळ महाराज

## वडगाव सावताळ येथे श्री दत्त सावताळ बाबा उत्सव संपन्न




**पारनेर/ प्रतिनिधी :**

**अहंकार सर्वात मोठा दुर्गुण आहे, तो नष्ट होणे गरजेच बोधरूपीकृष्ण आपल्या जीवनामध्ये आला पाहिजे असे प्रतिपादन ह. भ. प. डॉ. कृष्णकृपांकित विकासानंद मिसाळ महाराज यांनी केले.**

वडगाव सावताळ येथील जागृत देवस्थान श्रीदत्त सावताळ बाबा उत्सवाच्या काल्याच्या कीर्तन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी माजी सरपंच ज्ञानदेव शिंदे, राजेंद्र रोकडे, भाऊसाहेब शिंदे, शिवाजी सु. रोकडे, निवृत्ती शिंदे, मोहन रोकडे, गोरक्ष रोकडे, सरपंच संजय रोकडे, दादाभाऊ रोकडे, भास्करराव झावरे, गोधराम चौरे, अण्णा चौरे, डॉ भाऊसाहेब खिलारी, संतोष दाते, उद्योजक अशोक खराबी, अनिल गायकवाड, राजेंद्र रोकडे, माऊली ठुबे, संदीप व्यवहारे, बाबा दाते, कर्ण रोकडे सखाराम भोबाळ, माऊली खराबी व परिसरातील मान्यवर हजर होते. महिला भक्तांची संख्या लक्षणीय होती.

पुढे बोलताना डॉ. विकासानंद मिसाळ महाराज म्हणाले की परमेश्वर प्राप्तीसाठी साधना महत्त्वाची आहे, अव्यक्त परमतत्व भक्तावर कृपा करते भगवंतांचे स्मरण व चिंतन महत्त्वाचे आहे. धर्मकारण ही प्रधान कारण असून धर्माला धरून राजकारण व्हावे धर्म महत्त्वाचा आहे कीर्तनातून समाज प्रबोधन होत असते.

यावेळी ज्ञानोबा तुकाराम पुरस्कार मिळालेले डॉ. नारायण महाराज जाधव यांचा सत्कार वडगाव सावताळ ग्रामस्थांच्या वतीने डॉ. विकासानंद मिसाळ महाराज यांचे हस्ते करण्यात आला यावेळी दहीहंडी फोडण्यात आली पारनेर तालुक्यातील अनेक भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ यावेळी घेतला.

# चितपट कुस्तीने वाळवणे यात्रेची सांगता

## ■ लाखो भाविकांनी घेतले भैरवनाथाचे दर्शन ■ वाहतूक कोंडीचा नागरिकांना मनस्ताप

**सुपा : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील वाळवणे येथील लाखो भाविकांचे श्रध्दास्थान आसलेल्या भैरवनाथांची दोन दिवस चालणाऱ्या यात्रेची जंगी हगाम्याने सांगता झाली.**

बुधवार दिनांक २४, २५ एप्रिल रोजी यात्रा मोठ्या उत्साहाने पार पडली.भाविकांना दर्शन सुलभ मोकळ्या वातावरणात व्हावे यासाठी बॅरीकेट सह वेगवेगळ्या दर्शन रांगा करण्यात आल्या होत्या तर विक्रेत्यांसाठी मिठाई विभाग, नारळ पान फुले, खेळणी विभाग, संसार उपयोग साहित्य, बच्चेकंपनी साठी पाळणे, जनरल साहित्य असे वेगवेगळे विभाग करण्यात आले होते. यामुळे भाविकांची गर्दी विभागण्यास मोठी मदत झाली.

सुपा परिसरात सर्वात मोठी यात्रा आपधूप, जातेगाव, वाळवणे याठिकाणी भरते. यादिवशी परिसरातील गावांसह राज्यातील लाखो भाविक दर्शनासाठी रांगा करतात.बुधवारी रात्री अवकाळी पावसामुळे यात्रेत भाविकांचा हिरमोड झाला परंतु गुरूवारी संपुर्ण दिवस वाळवणे गावच्या आजुबाजुच्या शेतात जत्रेसाठी तंबु टाकलेले दिसत होते.




### वाहतूक कोंडीचा नागरिकांना मनस्ताप

**सुपा येथील मेन चौकातून येणाऱ्या जाणाऱ्यांची संख्या जास्त असल्याने व नगर पुणे महामार्गावरील गाड्यांमुळे मोठी वाहतूक कोंडी झाली. यादरम्यान नियोजनाच्या अभावामुळे विरूद्ध दिशेने येणाऱ्या वाहतूकीमुळे दोन्ही साईटचे रस्ते जाम झाले तर सुमारे दोन ते तीन किलोमीटर भाविकांना पायपीट करावी लागली.यादरम्यान नगरच्या दिशेने व शिरुरच्या दिशेने वाहनांची गर्दी झाली होती. या वाहतूक कोंडीचा भाविकांसह नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला.**

गुरुवारी दुपारी तीन नंतर वाळवणे येथे कुस्तीच्या जंगी हगाम्याचे आयोजन करण्यात आले होते. वाळवणे येथील हगामा राज्यात प्रसिद्ध आसल्याने राज्यभरातुन मल्लांनी वाळवणे येथील हगाम्यासाठी हजेरी लावली. यावेळी शेकडो निकाली कुस्त्या लावण्यात आल्या. यावेळी मल्लांना लाखो रुपयांची बक्षीसे देण्यात आली. यावेळी सरपंच संगीता गोरक्षनाथ दरेकर, वाळवणे देवस्थानचे अध्यक्ष नितीन पठारे, माजी सरपंच उत्तम पठारे, सुभाष थोरात, किशोर थोरात आदींसह शेकडो मल्ल व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. पंच म्हणून माजी सरपंच उत्तम पठारे, किशोर थोरात, सागर पठारे, ग्रामपंचायत सदस्य संतोष पठारे, महादेव रोकडे, शांतीलाल पठारे आदींनी काम पाहिले. यादरम्यान सुपा पोलीस निरीक्षक अरुण आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# देवांग कोष्टी समाज मंडळाच्या वतीने गुणवंतांचा सत्कार

## पदाच्या माध्यमातून सेवाभाव जपण्याचा मानस



**निघोज : प्रतिनिधी**

**भिंगार येथील सरपण गल्लीतील देवांग कोष्टी समाज मंडळाच्या वतीने गुणवंतांचा सत्कार करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र राज्य कारागृह विभाग येरवडा मध्यवर्ती कारागृह पुणे तुरुंग अधिकारी श्रेणी दोन जगदीश अर्जुन ढुमणे , दहशतवाद पथक नाशिक सहाय्यक पोलीस निरीक्षक राकेश सुभाष खेडकर, सनदी लेखापाल परिक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल अक्षरा ऋषिकेश पोंदे ( भिंगारकर ), सनदी लेखापाल परिक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल शुभदा बाळासाहेब बडदे, सनदी लेखापाल परिक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल अश्विनी सुनिल कुलट, राज्य लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून एम पी एस सी परिक्षेत उत्तीर्ण होऊन पी एस आय झाल्याबद्दल पूजा सुनिता रमेश वराडे तसेच ज्युनिअर इंटेलिजन्स ऑफिसर केंद्रीय गुप्तवार्ता विभाग मुंबई हल्ली नेमणूक अहमदनगर गणेश ऊर्फ सुनिल प्रभाकर लकारे आदी मान्यवर गुणवंतांचा सत्कार करण्यात आला.**

अहमदनगर येथील देवांग कोष्टी समाजाचे अध्यक्ष डॉ. दत्तात्रय पोंदे, देवांग कोष्टी समाजाचे भिंगार येथील अध्यक्ष किशोर भिंगारकर, उपाध्यक्ष अशोक लकारे, सचिव प्रकाश तरवडे, खजिनदार रमेश वराडे, सुनिल वराडे,दिपक बडदे, महेश तरवडे, श्रीमती संध्या फळे, जयश्री सुनिल वराडे आदी तसेच अहमदनगर देवांग कोष्टी समाजाचे सर्व पदाधिकारी व सदस्य तसेच भिंगार येथील व देवांग कोष्टी समाज मंडळाचे सर्व पदाधिकारी व सदस्य व समाजबांधव यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या वेळी गुणवंत मान्यवरांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की राज्य तसेच केंद्र सरकारच्या विविध पदावर काम करताना आपल्याकडून सर्वसामान्य जनतेची कामे कार्यक्षमपणे झाली पाहिजे हा खरा सेवाभाव आहे. अहिल्यानगर हा जिल्हा गुणवंतांची भुमी आहे या जिल्ह्यातून आपण सरकारच्या विविध पदावर कार्यरत असताना समाजाभिमुख जनता हा उद्देश ठेउन काम केले पाहिजे हीच आपली मानसिकता असून जिल्ह्याचा नावलौकिक वाढविण्यासाठी आपण प्रयत्नशील असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

अहमदनगर देवांग कोष्टी समाज मंडळाचे अध्यक्ष दत्तात्रय पोंदे यांनी यावेळी सांगितले की भिंगार देवांग कोष्टी समाज मंडळाचे अध्यक्ष किशोर भिंगारकर व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी सामाजिक भावनेतून काम करताना सेवाभाव केला आहे. समाजातील गुणवंत मान्यवरांचा सत्कार ही एक कौतुकास्पद बाब असून गुणवंताना प्रेरणादायी स्फूर्ती देण्याचे काम होत असल्याचे गौरवोद्गार त्यांनी व्यक्त केले आहे. देवांग कोष्टी समाज मंडळाचे भिंगार येथील अध्यक्ष किशोर भिंगारकर यांनी सांगितले की समाज सेवा मंडळ माध्यमातून अनेक उपक्रम राबवून समाजाला प्रोत्साहन देण्याचे काम होत असून समाज संघटीत झाला पाहिजे यातून समाजाच्या प्रश्नांची सोडवणूक झाली पाहिजे आणी गुणवंत मान्यवरांचा सत्कार ही बाब प्रत्तेकाला प्रोत्साहीत करणारी असल्याने हे सत्कार सोहळे समाजाच्या दृष्टीने अभिमानास्पद बाब असल्याचे प्रतिपादन भिंगारकर यांनी व्यक्त केले आहे .

# वादळी वाऱ्यात शाळेच्या आवारातील झाड कोसळले

## कुजकी झाडे विद्यार्थ्यांसाठी धोकादायक

**सुपा : प्रतिनिधी**

**श्रीगोंदा तालुक्यातील देवदैठण येथील श्री संतश्रेष्ठ निंबराज महाराज विद्याधाम प्रशालेच्या आवारातील भलेमोठे झाड वादळी वाऱ्यामुळे कोसळले.**

चौकोनी आकाराची प्रशालेची इमारत असून आवारात विद्यार्थ्यांना सावली मिळावी यासाठी झाडे लावलेली आहेत. पण ही जंगली झाडे आता खूप वाढलेली असून अधूनमधून त्याच्या फांद्या तुटून खाली पडतात. त्यामुळे ही झाडे कुजकी व धोकादायक बनली आहेत. यामुळे विद्यार्थ्यांच्या बाबतीत अपघात होऊ शकतो.

**शाळेच्या आवारातील झाडे धोकादायक झाली असल्याने ती काढण्याची परवानगी मिळावी यासाठी वनविभागाला चार दिवसांपूर्वीच पत्र दिले असून त्यांच्या परवानगीनंतर शाळेच्या आवारातील धोकादायक झाडे काढणार आहोत व नव्याने नियोजनबद्ध झाडे लावणार आहोत.**

**बाळासाहेब दहिफळे, मुख्याध्यापक**

बुधवारी संध्याकाळी देवदैठण परिसरात वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली



या जोरदार वादळात हे झाड उन्मळून पडले. उन्हाळ्याची सुट्टी असली तरी निकालाचे कामकाज सुरु आहे तसेच दहावीच्या विद्यार्थ्यांचे जादा तास सुरु आहेत. पण रात्रीच्या वेळी ही घटना घडल्याने अनुचित प्रकार टळला.

# तब्बल एक तपानंतर चोरीला गेलेले दागिने मिळाले

**नगर : प्रतिनिधी**

**शहरात १२ वर्षांपूर्वी चोरीला गेलेले दागिने कोतवाली पोलिसांनी निवृत्त शिक्षिकेला परत केले. दागिने मिळण्याची आशा सोडलेली असताना अचानक दागिने परत मिळाल्याने त्या निवृत्त शिक्षिकेला आनंद गगनात मावेनासा झाला. सुनीता सोन्याबापू सोनवणे (रा. शाहूनगर, केडगाव, नगर) असे निवृत्त शिक्षिकेचे नाव आहे.**

२६ जानेवारी २०१२ रोजी सुनीता सोनवणे या ध्वजवंदन कार्यक्रमासाठी सकाळी दुचाकीवरून नगरमधील १०८ महंत पंडित माध्यमिक



विद्यालय, नुतन कन्या शाळा येथे जात होत्या. त्यावेळी पाठीमागून दुचाकीवर आलेल्या चोरांनी सोनवणे यांच्या गळ्यातील एक तोळ्याचे मनी गंठण लंपास केले. या संदर्भात त्यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. पोलिसांनी या घटनेचा तपास लावत चोरांकडून मिनी गंठण हस्तगत केले.

दरम्यान, सोनवणे यांचा मोबाईल नंबर व घराचा पत्ता बदलल्याने त्यांच्याशी संपर्क होऊ न शकल्याने त्यांना दागिने मिळू शकले नाहीत. पोलिसांनी सोन्याचे दागिने परत नेण्याबाबत प्रसिद्धी पत्रक काढल्यावर सुनीता सोनवणे यांनी संपर्क केला. एक तपानंतर दागिने परत मिळाल्याने निवृत्त शिक्षिकेच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला. त्यांना हे दागिने कोतवाली पोलीस ठाण्याचे निरीक्षक प्रताप दराडे यांनी दिले.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com